



# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३२२, शनिवार १४ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# भाळवणी परिसरात हरीण, रानडुकरांची तस्करी!

## ■ ससे, मोर, घोरपडही रडारवर ■ वनविभाग तसेच पोलिसांचे सोईस्कर दुर्लक्ष





भाळवणी : विशेष प्रतिनिधी

**भाळवणी व परिसरातील वनविभागाच्या हद्दीमध्ये असलेल्या हरीण, रानडुकरे, ससे, मोर, घोरपड या वन्य प्राण्यांवर शिकाऱ्यांची वक्रदृष्टी पडली असून गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात या वन्य प्राण्यांची तस्करी करण्यात येत आहे. वन विभाग तसेच पोलिसांनी या तस्करीला आळा घालून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी वन्य जीव अभ्यासक अभिजित रोहोकले यांनी केली आहे.**

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार वन्य प्राण्यांची तस्करी करण्यासाठी नगर, पुण्याहून काही लोक पारनेर तालुक्याच्या वन विभागाच्या हद्दीमध्ये येऊन बेकायदेशीरपणे प्रवेश करून वन्य प्राण्यांची तस्करी करतात. असे प्रकार वारंवार घडूनही वन विभाग त्याकडे डोळेझाक करते. वास्तविक राखीव वनांमध्ये प्रवेश करण्यासाठी बंदी असताना तस्कर बिनदिक्तपणे या क्षेत्रात प्रवेश करून शिकार करतात. हे रोखण्यासाठी हत्यारबंद वन पोलिसांची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना राखीव वन क्षेत्रात फिरणारे तस्कर आढळले तरी ते कारवाई करत नाहीत. एखाद्या वन्य प्राण्याची शिकार केल्याचे आढळून आले तरच कारवाई केली जाते. बऱ्याचदा तडजोड करून कारवाई देखील टाळली जाते.

### वन्य जीवांसाठीचा स्टाफ वेगळा

वनविभाग तसेच अभयारण्यामध्ये काम करणारा स्टाफ स्वतंत्र आहे.अभयारण्यामध्ये काम करणारा एकही कर्मचारी तालुक्यात नाही. अशा कर्मचाऱ्यांना तालुक्यात संरक्षित वनांमध्ये नियुक्त करावे. मानद वन्यजीव रक्षकपदी वन्यजीव मित्रांची नियुक्ती करण्यात यावी.

**अभिजित रोहोकले**
वन्यजीव अभ्यासक

### गुन्हे टाळण्यावर भर

शिकारी कुत्री सोबत घेऊन आलेले तस्कर राखीव वनांमध्ये जाळे, सापळे लावून शिकार करतात. अपुरे कर्मचारी, हत्यार नसलेले वनरक्षक याचा फायदा घेत तस्करांचे फावते आहे. गुन्हे दाखल करण्याची किचकट प्रक्रिया, कायद्याचे अपुरे ज्ञान, फारेन्सीक लॅबमध्ये व्हिसेरा तपासणीसाठी पाठविण्याचा खर्च आणि वेळ तसेच राजकीय दबाव यामुळे गुन्हे दाखल केले जात नाहीत.

### हिवरे कोरडा येथील संशयास्पद कारवाई !

चार दिवसांपूर्वी रात्रीच्या वेळी हिवरे कोरडा येथे संशयास्पदरित्या फिरणाऱ्या चौघांना ग्रामस्थांनी पकडून त्यांना पोलीसांच्या हवाली केले. पोलीसांनी त्यांची झडती घेतली असता त्यांच्या पिशवीमध्ये हरणाचे पिलू आढळून आले. पोलीसांनी ते पिलू वन विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या ताब्यात दिले. वन्य प्राण्याला ताब्यात घेतल्यानंतर हे कृत्य करणाऱ्याचौघांवर काय कारवाई झाली याची माहीती मात्र उपलब्ध होण्यास तयार नाही. यासंदर्भात वन विभागाचे कर्मचारी बढे यांच्याशी संपर्क साधला असता पोलीसांनी आमच्याकडे हरणाचे पिलू दिले आम्ही त्यास जंगलात सोडून दिल्याचे त्यांनी सांगितले. पोलीसांनी पुढे केलेल्या कारवाईबाबत आपण अनभिज्ञ असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले. भाळवणी दुरक्षेत्राचे कर्मचारी शेलार यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनीही कानावर हात ठेवले. पोलीस निरीक्षकांना विचारा असे सांगत त्यांनी वेळ मारून नेली. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्याशी संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न करूनही त्यांचा फोन सतत व्यस्त येत होता.

### कारवाईबाबत अनास्था

पारनेर तालुक्यात वन क्षेत्र जास्त असल्याने पारनेर व टाकळी ढोकेश्वर या दोन विभागांत विभागणी करण्यात आलेली आहे. दोन्ही विभागासाठी प्रत्येकी एक रेंजर व स्टाफ नियुक्त आहे. अपुरा स्टाफ आणि कारवाईबाबत अनास्था यामुळे वन्य जीवांची मोठया प्रमाणावर तस्करी होते आहे.

### वनविभागाला वाळूच्या तस्करीत रस

वनविभागाच्या हद्दीलगतच्या वाहणाऱ्या नद्या, ओढयांतून वाळूची तस्करी करण्यात येते. हे वाळू तस्कर वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी यांना हाताशी धरून वन विभागाच्या हद्दीत वाळू उपसतात. वन विभागाच्या हददीतूनच त्याची वाहतूक केली जाते. त्या बदल्यात अधिकारी, कर्मचारी यांना महिन्याला मलीदा पोहच केला जातो. वनकुटे वन क्षेत्रात मध्यंतरी मोठया प्रमाणावर झाडांची कत्तल झाली, वाळूचा उपसाही झाली. त्यावर कारवाई मात्र काहीच झाले नाही हे देखील अधोरेखीत करण्यासारखे आहे.

### रानडुकरे, हरणांच्या मांसाची विक्री

तालुक्याच्या संरक्षित वनातून रान डुकरे, हरणांची शिकार केल्यानंतर त्याच्या मांस शौकीनांसाठी तालुक्यातच त्याची विक्री करण्यात येत असल्याची धक्कादायक माहीतीही पुढे आली आहे. तालुक्यातच शिकार करून त्याच्या मांसाची विक्री होत असताना वन विभाग, पोलीस करतात तरी काय हे न उलगडणारे कोडे आहे.

### वन्य प्राणी पाळण्यासाठीही तस्करी

विशेषतः शहरी भागातील शौकीन नागरीक मोर, हरीण, ससे पाळण्यासाठीही मोठी रक्कम मोजत असल्याने हरीण, मोर, ससे यांच्या पिलांची तस्करीही मोठया प्रमाणावर करण्यात येते. या पिलांचे मोलही मोठे असल्याने तस्करांचे त्यावरही लक्ष केंद्रीत असते. चार दिवसांपूर्वी पकडण्यात आलेले हरणाचे पिलू अशाच शौकीनाच्या मागणीवरून पकडण्यात आले असावे.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे २५ उमेदवार ठरले!

## ■ अजित पवार स्वतः बारामती लढवणार? ■ पक्षांतर्गत बैठकीत अंतिम निर्णय ■ नगरमधून पुन्हा संग्राम जगतापच



पुणे : प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या गोटातून एक मोठी बातमी पुढे आली आहे. राष्ट्रवादीने आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या २५ उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. त्यात अजित पवार यांच्यासह बहुतांश विद्यमान आमदारांच्या नावांचा समावेश आहे. अजित पवार स्वतः बारामती विधानसभा मतदारसंघातून लढणार आहेत. राष्ट्रवादीने अद्याप या यादीची पुष्टी केली नाही, पण ही यादी फायनल असल्याचे सांगितले जात आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेसची येथे एक महत्त्वाची बैठक झाली. या बैठकीत आगामी विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या २५ संभाव्य उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली. अजित पवार यांनी नुकतेच बारामती विधानसभा मतदारसंघ सोडण्याचे संकेत दिले होते. पण या बैठकीत बारामती येथून तेच निवडणुकीच्या रिंगणात उतरतील असे स्पष्ट करण्यात आले आहे. याशिवाय पुणे हिट अँड रन प्रकरणात वादाच्या भोवऱ्यात अडकलेले आमदार सुनील टिंगरे यांच्याही नावावर या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती आहे. सुनील टिंगरे त्यांच्या वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघातूनच मैदानात उतरतील अशी माहिती आहे.

### राष्ट्रवादीचे संभाव्य उमेदवार

- ■ बारामती – अजित पवार
- ■ येवला – छगन भुजबळ
- ■ आंबेगाव – दिलीप वळसे-पाटील
- ■ परळी – धनंजय मुंडे
- ■ कागल – हसन मुश्रीफ
- ■ दिंडोरी – नरहरी झिरवळ
- ■ रायगड – अदिती तटकरे
- ■ अहमदनगर – संग्राम जगताप
- ■ खेड – दिलीप मोहिते-पाटील
- ■ अहेरी – धर्मराव बाबा अत्राम
- ■ कळवण – नितिन पवार
- ■ इंदापूर – दत्ता भरणे
- ■ उदगीर – संजय बनसोडे
- ■ पुसद – इंद्रनील नाईक
- ■ वाई खंडाळा महाबळेश्वर – मकरंद आबा पाटील
- ■ पिंपरी –अण्णा बनसोडे
- ■ मावळ – सुनील शेळके
- ■ अमळनेर – अनिल पाटील
- ■ जुन्नर – अतुल बेनके
- ■ वडगाव शेरी – सुनील टिंगरे

# राज्यात फक्त दोनच साहेब आहेत !

## खा.कोल्हेंनी डागले अजितदादांवर टिकास्त्र

खेड : प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे खासदार अमोल कोल्हे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. ''केवळ एका पक्षाचा अध्यक्ष होणे म्हणजे साहेब होणे असा अर्थ होत नाही. राज्यात केवळ दोनच साहेब आहेत''. अशा शब्दांत अमोल कोल्हे यांनी अजित पवार यांच्या साहेब या टिप्पणीवर प्रतिक्रिया दिली आहे.**



गुरुवारी (१२ सप्टेंबर) खेड (पुणे) येथील सभेत बोलताना अजित पवार म्हणाले होते की ''उमेदवारी कोणाला द्यावी, कोणाला नाही, याबाबत वारंवार कोणत्याही व्यक्तीला विचारावं लागत नाही, कारण आता आपणच साहेब आहोत''. त्यांच्या या वक्तव्यावर अमोल कोल्हे यांनी तिखट शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे.

अमोल कोल्हे म्हणाले, ''राज्यात फक्त दोनच साहेब आहेत. एक शरद पवार आणि दुसरे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे. आमची पिढी उर्वरीत पान ३ वर

# लाडकी बहीण योजनेतही फसवणूक?

## ■ पुरुषांनी वापरले महिलांचे फोटो ■ कन्नड तालुक्यात प्रकार उघड



कन्नड : प्रतिनिधी

**महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत रक्षाबंधनाच्या दिवशी राज्य सरकारने जुलै महिन्यात अर्ज केलेल्या ८० लाख महिलांच्या खात्यात पैसे पाठविले आहेत. महिलांच्या खात्यात पैसे येत असल्याचे पाहून आता काही पुरूषांनीही महिलांचा फोटो वापरून स्वतःच्या बँक खात्याची माहिती देत अर्ज भरल्याचे समोर आले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात हा प्रकार घडल्याचे निदर्शनास आले असून याची चौकशी सुरू आहे.**

उर्वरीत पान ३ वर




# सातबारा उताऱ्यावर आता आईचेही नाव!

## ■ महायुती सरकारचा निर्णय ■ १ नोव्हेंबरपासून अंमलबजावणी

मुंबई :प्रतिनिधी

**सातबारा उताऱ्यावर आता आईचेही नाव लावण्याचा मोठा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे. येत्या एक नोव्हेंबरपासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सरकारी कागदपत्रांवर आईचे नाव लावण्याचा निर्णय झाल्यानंतर आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सातबारा उताऱ्यावरही आईच्या नावाचा समावेश करण्यास हिरवा कंदील दाखवला आहे.**

**एक मेनंतर जन्मलेल्या व्यक्तींसाठी बंधनकारक**

एक नोव्हेंबर २०२४ या तारखेपासून संबंधित निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे. एक मे २०२४ नंतर जन्म झालेल्या व्यक्तीच्या नावावर जमीन खरेदी करायची असल्यास त्यांच्या आईचे नाव बंधनकारक करण्यात आले आहे. विशेष म्हणजे वडिलांचे नाव लावणे बंधनकारक नसेल.

**विवाहित महिलांना पती किंवा वडिलांच्या नावाची मुभा**




तसेच, यापुढे सातबारा उताऱ्यात कुठलाही फेरफार करायचा असेल, तर त्यामध्येही आईचे नाव लावले जाणार आहे. विवाहित महिलांना पती किंवा आपल्या वडिलांचे नाव लावण्याची मुभा देण्यात येईल. याबाबतचा प्रस्ताव भूमी अभिलेख विभागाने राज्य सरकारकडे पाठवला आहे.

दरम्यान, संबंधित निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनाने भूमी अभिलेख विभागाकडे पाठवला होता. यात राहिलेल्या काही त्रुटींचा अभ्यास करून त्यावर उपायही योजण्यात आले आहेत. त्याची अंमलबजावणी एक नोव्हेंबर २०२४ पासून करण्यासाठीचा प्रस्ताव राज्य सरकारला देण्यात आल्याची माहिती आहे.

मराठीसह २४ भाषांमध्ये सातबारा उतारा उपलब्धदरम्यान, जमिनीबाबत इत्यंभूत माहिती देणारा सातबारा मराठी भाषेसह अन्य २४ भाषांमध्ये उपलब्ध करण्याचा निर्णय गेल्या वर्षी मोदी सरकारने घेतला होता. देशातील अशा स्वरूपाचा पहिलाच प्रयोग महाराष्ट्रात राबवण्यात आला होता.

महाराष्ट्रात अन्य राज्यातील नागरिकही मोठ्या प्रमाणावर राहतात. विशेषतः तमिळनाडू, मध्य प्रदेश, बिहार, पंजाब, गुजरात यासारख्या राज्यांतील नागरिकांचा यामध्ये समावेश आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील अन्यभाषिक राज्यांच्या नागरिकांना त्यांच्या भाषेतील सातबारा मिळणे शक्य होत आहे. केंद्र सरकारच्या डिजिटल इंडिया लँड रेकॉर्ड ॲक्शन प्रोग्रामनुसार हा सातबारा उतारा अन्य भाषांमध्ये असावा, असे सुचवण्यात आले होते.



फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

दागिन्यांचा विषय निघाला की चर्चेचा मोर्चा सहजच इतर देशांकडे वळतो. दरवर्षी कपडे, ॲक्सेसरीज यांच्यासोबत दागिन्यांचे ट्रेण्डसुद्धा जगभरात बदलत असतात. यंदाच्या जगभरातील दागिन्यांच्या ट्रेण्डवर एक नजर....



## भारताबाहेरचे ट्रेण्ड्स!

### स्टेटमेंट इअररिंग्स

गेल्या काही वर्षांपासून नेकपीसला जास्त महत्त्व दिलं गेलं होतं. आता मात्र फोकस इअररिंग्सवर आहे. मोठाले, लांब कानातले डूल यंदा आवर्जून पाहायला मिळतील. प्लास्टिक, थ्रीडी तंत्रज्ञान यामुळे दागिन्यांचं वजन काही प्रमाणात कमी झालं आहे. त्याचा परिणाम म्हणून ओव्हरसाइज कानातले यंदा न्यूयॉर्क आणि पॅरिसच्या रनवेवर पाहायला मिळाले. अर्थात यांच्यासोबतच मोती, रंगीत खडे, सोने, हिरे यांचा वापरही इअररिंग्समध्ये आवर्जून करण्यात आला होता. इअररिंग्समधील यंदाचा महत्त्वाचा बदल म्हणजे दोन्ही कानांतील समान इअरिरग्सना फाटा देत एकाच कानात इअररिंग घालायची किंवा दोन्ही कानात वेगवेगळे इअररिंग्स घालायची पद्धत यंदा रुजू झाली आहे. आपल्याकडे मागच्या वर्षी इअरकफचा ट्रेण्ड आला होता. एका किंवा दोन्ही कानांमध्ये संपूर्ण कानाच्या आकाराचं, नजरेत भरणारं इअरकफ घातलं जायचं. पण तेव्हा दुसऱ्या कानामध्ये छोटा खडा घातला जायचा. पण यंदा मात्र इअरकफसोबत दुसरा कान मोकळा सोडला जातोय. तसचं इअरकफचा आकारही वाढला आहे. सध्या दैनंदिन वापरातचं नाही तर पार्टी, समारंभाला जातानासुद्धा वेगवेगळे दागिने घालण्याऐवजी एकच नजरेत भरणारा दागिना घालण्याकडे तरुणाई पसंती देत आहे. हे दागिन्यांचा आकार वाढण्याचं मुख्य कारण आहे. याचबरोबर तुम्हाला दोन्ही कानांत डूल घालायचेच असतील तर दोन वेगवेगळे डूल घालायचा प्रयोगही यंदा केला गेलाय. तुमच्या ड्रेसमधील दोन मुख्य रंग निवडून (कॉन्ट्रास असतील तर उत्तम) त्या रंगाचे कानातले यात घातले जातात. यामध्ये दोन्ही कानांतल्यांचा आकार वेगळा असेल तरी चालू शकतं. पण सुरुवातीला प्रयोग करताना किमान एक घटक समान असू द्या. उदा. मूळ चौकोनी आकाराचे कानातले निवडून दोघांचे आकार छोटे-मोठे असू द्या. दोन्ही कानांतल्यांचा बेस रंग समान असू द्या. तसेच एक कुंदन आणि एक हिऱ्याचं डूल असं एकदम टोकाचे कानातले निवडून चालणार नाही. शक्यतो दोन्ही कानातले मोठे, केसांमध्ये न लपता पटकन नजरेत येणारे असू द्या. तुम्हाला पारंपरिक इअररिंग्स पसंत असतील तर कानाच्या आकारापेक्षा मोठे आणि भौमितिक आकारांचे इअररिंग्स वापरता येतील.

### पारंपरिक मोटिफ्स आणि मोती

दागिन्यांमध्ये नक्षीकाम आणि मोटिफ्स कोणते वापरतो, याला अधिक महत्त्व आहे. पेइझ्ली, फ्लोरल, मीनाकारी, भौमितिक, प्राणी-पक्ष्यांचे आकार असे कित्येक मोटिफ्स दागिन्यांमध्ये वापरले जातात. यंदा नवीन चिन्हे निवडण्याऐवजी पारंपरिक चिन्हांना डिझायनर्सनी पसंती दिली आहे. यामध्ये कित्येक धार्मिक चिन्हांचा, पुरातन वास्तूमधील चिन्हांचा प्रामुख्याने समावेश आहे. ख्रिश्चनांचा क्रॉस, इजिप्त, ग्रीक संस्कृतीतील चिन्हे, प्राण्यांचा आकार यांचा समावेश केला गेलाय. फ्लोरल आकारांवरसुद्धा ग्रीक, पर्शियन शिल्पकलेचा प्रभाव आवर्जून पाहायला मिळतो. यंदाच्या दागिन्यांमध्ये प्रामुख्याने नजरेत येणारा घटक म्हणजे मोती. मोठाले, शक्यतो सफेद मोती यंदा कित्येक डिझायनर्सनी दागिन्यांमध्ये वापरले आहेत. हिरे आणि इतर धातूंच्या तुलनेत मोत्यांचे दागिने कपडय़ांच्या वेगवेगळ्या रंगांवर खुलून दिसतात. तसेच पारंपरिक, फॉर्मल, पार्टीवेअर सगळ्याच लुकवर ते वापरता येतात. त्यामुळे मोत्यांचा वापर यंदा दागिन्यांमध्ये केला गेलाय. सफेद आणि क्रीम रंगाच्या मोतींसोबत रंगीत मोतीही यंदा वापरले गेले आहेत. यांच्यासोबतच रंगीत मिनरल्सचा वापरसुद्धा पेण्डंटमध्ये केला गेलाय. सोने, चांदी, प्लॅटिनम या खऱ्या धांतूऐवजी प्लास्टिक, सोन्याचांदीचं पाणी चढवलेले धातू, लेदर, कापड यांचा वापरही दागिन्यांमध्ये केला गेलाय.

### चोकर आणि नाजूक नेकपीस

यंदा इअररिंग्सवर अधिक लक्ष दिलं गेल्याने नेकपीस सिंपल ठेवण्याकडे बऱ्याच डिझायनर्सनी पसंती दिली आहे. विशेषतः ९०च्या दशकातील गळ्याभोवती घट्ट बसणारा चोकर पुन्हा पाहायला मिळतो आहे. पण यंदा त्याचं रूपं विस्तारलं आहे. पारंपरिक लेदर किंवा प्लास्टिकच्या पट्ट्याच्या चोकरसोबत धातू, मणी यांचा वापर करून केलेले मोठाले चोकरसुद्धा लक्ष वेधून घेत आहेत. तुम्हाला गळाबंद चोकर नको असेल तर नाजूक पेण्डण्ट किंवा नेकपीसचा पर्यायसुद्धा डिझायनर्सनी दिला आहे. मध्यम आकाराच्या खड्यांची नाजूक माळ किंवा नाजूक सरीसोबत मोठाले पेण्डण्ट हे प्रकार यंदा आवर्जून पाहायला मिळतील. अर्थात हे पेण्डण्टसुद्धा इअररिंग्सप्रमाणेच आकाराने मोठे आहेत. कानातून गळ्याभोवती जाणारा नेकपीस, स्कार्फप्रमाणे गळयामागून येत समोर मोकळा सोडलेला नेकपीस असे कित्येक प्रयोग डिझायनर्सनी यंदा केले आहेत.

### आर्मकफ आणि अंगठ्या

मघाशी म्हटल्याप्रमाणे अंगभर दागिने घालण्यापेक्षा एक नजरेत भरणारा दागिना घालण्याकडे डिझायनर्सचा यंदा कल आहे. त्यातीलच एक प्रकार म्हणजे आर्मकफ. थोडक्यात सांगायचं झाल्यास अंगठी आणि कड्याला जोडणाऱ्या हातफुलाचं उदाहरण घेता येईल. पण इअररिंग्सप्रमाणेच या आर्मकफचा आकार मोठा आहे. फ्लोरल आकारांसोबत दोरीची नॉट, वेल, भौमितिक आकार या विविध आकारांचा वापर यात केला आहे. यावर्षी खडे, मोती, माणिक यांच्या मोठय़ाला अंगठय़ासुद्धा नक्की पाहायला मिळतील. पण हल्ली एकच अंगठी घालून भागत नाही. सगळ्या बोटांमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या अंगठ्या घालायची पद्धत आता रुजू झाली आहे. अगदी एकाच बोटात दोन-तीन अंगठ्याही घातल्या जातात. त्यानुसार नाजूक अंगठ्याही पाहायला मिळतात. काही वर्षांपूर्वीपर्यंत परदेशातील हे ट्रेण्ड्स भारतात येईपर्यंत दोन-तीन वर्षे जायची. पण हल्ली मात्र जागतिक ट्रेण्ड्स भारतात लगेचच पाहायला मिळतात. त्यामुळे हे ट्रेण्ड्स न्यूयॉर्क, पॅरिसमध्ये दिसून आले असले, तरी भारतातसुद्धा त्यांची चाहूल लागलेली आहे.



दागिन्यांचं खरं सौंदर्य पारंपरिक रूपात दिसून येत असलं तरी आता काळानुरूप दागिन्यांमध्येही बदल होताना दिसताहेत. आधुनिक पद्धतीचे, पण पारंपरिक वलय असलेले विविध स्वरूपातील दागिने तरुणींसाठी पर्वणी ठरत आहेत...

# बहुढंगी लखलखते दागिने...

ट्रेनमध्ये हँगरवर लटकवलेले कानातले डूल, पैंजण, कडे असोत किंवा फॅशन स्ट्रीटवरच्या दुकानात मोलभाव करून घेतलेले स्टेटमेंट नेकपीस, डिझायनरचं खास हटके कलेक्शन असो किंवा सोन्याच्या दुकानात डोळे दिपवून टाकणारे दागिने... स्वरूप काहीही असो दागिने स्त्रीच्या मनाला भुरळ घालणार नाहीत, असं होणं शक्य नाही. कपडे आणि दागिन्यांची हौस फिटत नाही असं म्हणतात ते उगाच नाही. पण, तरीही दागिन्यांवरचं तिचं प्रेम किंचित जास्त असतं. त्याला कारणच तसं असतं म्हणा ना. एखादं दिवशी काहीच पर्याय नाही म्हणून जुना, साधासा टॉप घालावा लागला, तर त्यासोबत छानसं कानातलं घातलं की दिवस मस्त जातो, मैत्रिणीला वाढदिवसाला गिफ्ट देताना कपड्यांच्या साईझवरून गोंधळ होऊ शकतो पण, नेकपीस, कड्याबद्दल हा गोंधळ कधीच होऊ शकत नाही. जुने कपडे काळानुसार उसवले जातात, तोकडे पडतात पण, दागिने तुमची साथ क्वचित प्रसंगीच सोडतात. दागिन्यांचं महत्त्व कवींनाही पटलं आहे. त्यामुळेच तर त्यांनी झुमक्यापासून नथनीपर्यंत, बांगड्यांपासून पैंजणांपर्यंत कित्येक दागिन्यांवर कविता-गाणी करून ठेवली आहेत, नाही का..!

आजची तरुणीसुद्धा कितीही मॉडर्न झाली असली तरी तिची दागिन्यांची आवड काही संपली नाही. त्यामुळेच तर आज तिच्यासाठी तिच्या मागणीनुसार दागिन्यांची एक मोठी बाजारपेठ उभी ठाकली आहे. त्यात पारंपरिकतेपासून आधुनिक पद्धतीच्या दागिन्यांपर्यंत, सोन्यापासून जडाऊ, हिरे कुंदनपर्यंत अनेक पर्याय तिच्यासमोर आहेत. अगदी आता-आतापर्यंत केवळ लग्न ठरल्यावर सोन्याच्या दुकानात पाय ठेवणारी तरुणी पहिला पगार, प्रमोशन, तर कधी सहज मनाला आलं म्हणून हिरे, सोन्याचे दागिने खरेदी करू लागली आहे. पण, म्हणूनच हे दागिने कडीकुलपात बंद करून फक्त सणांच्या वेळी काढण्याऐवजी रोज ऑफिस, पार्टी, गेटटूगेदरमध्ये मिरवणे ती अधिक पसंत करते. नवीन इंटर्न म्हणून ऑफिसला रुजू झाल्यावर फॅशन स्ट्रीटवर तिने केलेल्या बार्गेनचे किस्से रंगवणारी ती दोन-एक वर्षांत किती कॅरेटचा हिरा किती लकाकतो याच्या गप्पा रंगवायला लागते. तेव्हा तिच्यासोबत तिचे दागिनेसुद्धा कात टाकू लागले आहेत हे लक्षात यायला लागतं...

### इमिटेशन ज्वेलरीचा प्रभाव



तरुणींवर असलेला इमिटेशन किंवा फॅशन ज्वेलरीचा प्रभाव नाकारता येणार नाही. त्यामुळे सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीमध्ये इमिटेशन ज्वेलरीमधील मोटिफ, डिझाइन वापरलं जाऊ लागलं आहे. इमिटेशन ज्वेलरीच्या स्टाइलचे हत्ती, वाघ, सिंह असे विविध मोटिफ, झुंबराकृती, एसिमेट्रिकल आकार, पठडीच्या रंगांपेक्षा वेगळे रंग असे अनेक गुण पारंपरिक सोन्याच्या आणि हिऱ्याच्या जडणघडणीत वापरत येत आहेत. हत्तीच्या छबी वापरून अंगठ्या, पेंडेंट्स हल्ली अनेक ज्वेलर्सकडून बाजारात आणली जात आहेत.

### अंगठ्यांना पहिली पसंती

कित्येकदा तरुणी त्यांच्या साठवलेल्या पैशातून अंगठी घेण्यास पसंती देतात. तसंच हल्ली लग्नानंतर मंगळसूत्र रोज वापरण्यापेक्षा सणाच्या किंवा कार्यक्रमाच्या दिवशी कपाटाबाहेर काढलं जातं. त्याऐवजी तरुणी साखरपुड्याची अंगठी घालण्यास पसंती देतात. त्यामुळे अशा वेळी आपली अंगठी सुंदर आणि चारचौघांत उठून दिसावी याकडे भर दिला जातो. म्हणून गेल्या दोन वर्षांत अंगठय़ांच्या डिझाइन्समध्ये भरपूर विविधता पाहायला मिळाली. यामध्ये अंगठीचा रंग, आकार, साइज यामध्ये प्रयोग करण्यात आले. सध्या थ्रीडी स्टाइल आणि दोन बोटांत घालायच्या अंगठीला पसंती मिळत आहे. प्लॅटिनमच्या अंगठ्या तर साखरपुड्यासाठी पहिली पसंती असते.

### डिटॅचेबल ज्वेलरी

बाजारात 'मल्टी युझ' ज्वेलरी, 'डिटॅचेबल ज्वेलरी' अशा विविध नावांनी या दागिन्यांना संबोधले जाते. मध्यंतरी दागिन्यांच्या जाहिरातींमध्ये मॉडेलच्या केसांची छानपैकी हेअरस्टाइल करून त्यात हिरे, जडाऊचे हार खोवले जायचे. जेणेकरून हाराला हेडपीसचा लुक येत असे. खास समारंभाला आवर्जून पार्लरला जाऊन तयार होणाऱ्या तरुणी हाराचा असा वापर नक्कीच करून पाहतात. यामुळे ड्रेसचा गळा हारामुळे लपला न जाता फोकसमध्ये येतो. लुकला नवेपणाही मिळतो.

### सोन्यातही मिक्स मॅच

पूर्वी सोन्याचा हार घेताना कानातले डूल त्यासोबतच यायचे. बांगड्याही हाराला साजेशा घेतल्या जायच्या. जेणेकरून दागिन्यांचा 'सेट' बनत असे. पण हल्ली वेगवेगळ्या सेटमधील दागिने मिक्स मॅच करून घालण्याचा ट्रेंड सोन्याच्या दागिन्यांमध्येसुद्धा रुजू होत आहे. 'तरुणी हल्ली कानातले डूल, हार, बांगडय़ा असं वेगवेगळं डिझाइन आणि गरजेनुसार वेगवेगळं खरेदी करतात. मग समारंभानुसार एक किंवा अनेक दागिने घातले जातात. यामुळे त्यांना निवडक दागिन्यांतही पर्याय मिळतो. सणाच्या दिवशी साडी ते पार्टीसाठी गाऊनपर्यंत आजची तरुणी प्रसंगानुसार कपड्यांची निवड करते. त्यामुळे साडीसोबत खुलणारे कानातले हिऱ्याचे डूल गाऊनसोबत पण उठून दिसतील, याची काळजी ती खरेदी करताना घेते.

### फुलाफुलांची मोहक दुनिया...

- कोणताही कपडा नजरेत भरला की त्यावर फुलांची डिझाईन आहे का याची लगेचच विचारणा होते. विविध रंग आणि आकारांच्या देखण्या डिझाईन्स लक्ष वेधून घेतात. फ्लोरल म्हणजेच फुलांच्या डिझाईन्स, पॅटर्न्सना दागिने आणि कपड्यांमधून कधीच मरण नव्हते. पण, यंदाच्या सीझनमध्ये स्त्रियांचे फुलांवरचे प्रेम किंचित जास्तच झालंय. त्यामुळे रॅम्पवर कपडे आणि दागिन्यांमधील फ्लोरल डिझाईन्स हा यंदाचा सर्वात मोठा ट्रेंड आहे. फुलाफुलांची मोहक दुनिया आता ज्वेलरीमध्येही बघायला मिळेल.
- 'फ्लोरल आणि टेम्पल डिझाईन्स या दागिन्यांच्या बाबतीत एव्हरग्रीन असतात यात वाद नाही. पण, यंदा फ्लोरल डिझाईन्सचा झालेला वापर थक्क करणारा आहे. हे प्रमाण इतकं वाढलं की, 'फ्लोरल ज्वेलरी' नावाची नवी संज्ञा जन्माला आली. यात फुलांचे डिझाईन असलेले नेकलेस, कानातले डूल, बांगड्या असे पारंपरिक प्रकार तर आहेतच. पण, हातफूल, चोटी (केसांच्या वेणीवरचा हेडपीस) यांसारखे वापरातून मागे पडलेले जुने दागिन्यांचे प्रकार परत आले आहेत.
- कित्येक बड्या बॉलीवूड सेलेब्रिटीजनी या फ्लोरल ज्वेलरी मिरवल्या आहेत. या फ्लोरल डिझाईनला अजूनच खुलवण्याचं काम केलं आहे ते दागिन्यांना दिल्या जाणाऱ्या अनेक पदरी डिझाईनने. मागच्या वर्षीपासून थ्रीडी डिझाईन्सचा ट्रेंड दागिन्यांमध्ये रुजू झाला आहे. यामुळे दागिन्यातील फुलांमधील प्रत्येक पाकळी उलगडलेली आणि त्यातील बारीक नक्षीकाम पाहायला मिळतं. पार्टीसाठी असं फुलाचं डिझाईन असलेलं एखादं ओव्हरसाईझ कानातलं सहज घालता येतं. ते छान इंडो-वेस्टर्न, क्लासी लुक देतं. सणासमारंभाला त्यासोबत एखादा नेकपीस किंवा कडे घालून पारंपरिक लुकही मिळू शकतो. याखेरीज यंदा सिम्पल आणि सुटसुटीत डिझाईन्सवर जास्त भर दिला गेला आहे. दागिन्यांतील मुख्य मोटीफ किंवा खडा फोकसमध्ये येईल याची काळजी डिझायनर्स घेऊ लागले आहेत. त्यामुळे दागिन्यांना उठाव मिळतोच, पण बदलत्या काळानुसार डिझाईन जुनी वाटत नाही.

### एकच दागिना, वापर वेगवेगळ्या पद्धतीने...




फॅशन इंडस्ट्रीमध्ये असंख्य प्रयोग होत असतात. त्याचा अनुभव घेता येतो तो फॅशन स्ट्रीट किंवा तत्सम शॉपिंगसाठी असलेल्या लोकप्रिय ठिकाणी. हे प्रयोग बघून तरुण मुली घरच्या घरीसुद्धा त्याचं अनुकरण करतात. केवळ कपड्यांच्या बाबतीतच हे अनुकरण न करता आता त्यांनी मोर्चा वळवलाय तो ज्वेलरीकडे. कपड्यांमध्ये जसं एकच स्टोल किंवा स्कार्फ वेगवेगळ्या पद्धतीने घेतला जाऊ शकतो तसं दागिन्यांमध्ये करता येतं, याचं प्रात्याक्षिक तरुण मुली करत असतात. याचा अंदाज घेऊनच डिझायनर्सनेही उत्तम संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. एकच दागिना आता वेगवेगळ्या स्टाइल्समध्ये वापरता येईल. दिवसागणिक वाढती सोन्याची किंमत भारतीयांच्या मनातील सोन्यावरचे प्रेम कमी करू शकत नाही, हे खरं आहेच. पण, एकदा विकत घेतलेला दागिना जास्तीत जास्त कसा वापरता येईल हा प्रयत्न स्त्री करतच असते. कित्येकदा लग्नात केलेले दागिने इतके मोठे असतात, की ते छोट्या-छोट्या कार्यक्रमांना घालता येत नाहीत, तर कधी तेच तेच दागिने घालून कंटाळा येतो, मग ते मोडून नवीन दागिने करायचा घाट घातला जातो. ही गैरसोय टाळण्यासाठी डिझायनर्स एकच दागिना वेगवेगळ्या पद्धतीने कसा वापरता येईल याचा विचार करू लागले आहेत. एका कलेक्शनमधील मुख्य नेकलेसपासून अलग करता येणार पेडंट एखाद्या चेनमध्ये घालून वेगळं घालता येऊ शकतं. त्यांच्याच 'प्लॅटर' कलेक्शनमध्ये वेगवेगळ्या रंगाच्या खड्यांचे पर्याय असलेली अंगठी देण्यात आली आहे. जेणेकरून एक अंगठी तीसहून अधिक पद्धतीने वापरता येते. तुमच्या ड्रेसला मॅच होणारी अंगठी यामुळे बदलता येते. गळ्यातील नाजूक हिऱ्यांची सर वेगळी केल्यास मांगटिका किंवा ब्रेसलेट म्हणून वापरता येईल. बाजूबंद किंवा अँकलेट म्हणून वापरता येणारा कडा असे प्रयोग यामध्ये केले जात आहेत. जेणेकरून दागिन्यांचा वापर वाढवता येणं शक्य होईल.

### स्टाइल आधुनिक, टच पारंपरिक...

तसं म्हणायला सोन्याच्या दागिन्यांच्या बाबतीतही स्त्रियांना पूर्वीपासून एखाद-दुसरी डिझाइन बघून भागायचं नाहीच. त्यांना पर्याय लागायचेच. त्यात पुरुषांप्रमाणे 'दुकानात जाऊन काही विकत न घेता बाहेर येणं विचित्र दिसतं', याबद्दल त्यांना फारसं कधीच काही वाटलं नाही. उलट जुन्याकाळी दागिन्यांचं गाठोडं घरी घेऊन येणाऱ्या सराफालासुद्धा 'माझ्या माहेरच्या सराफाच्या दागिन्यांची तोड नाही हो याला' हा टोमणा चुकत नसे. पण आजच्या घडीला केवळ फॅशन ज्वेलरी आणि इमिटेशन दागिन्यांइतकीच सोने, हिऱ्याची बाजारपेठ विस्तारू पाहात आहे. कारण आजची तरुणी सोन्याचे दागिने केवळ लग्नासाठी किंवा सणांसाठी वापरण्याऐवजी रोज वापरण्यास पसंती देऊ लागली आहे. अर्थात प्रत्येक मुलीसाठी तिचं 'लग्न' हा अजूनही तितकाच महत्त्वाचा मुद्दा आहे आणि त्यावेळी खास बनविल्या जाणाऱ्या दागिन्यांचे महत्त्वही तितकंच आहे. पण असं असताना हे दागिने लग्नानंतर कितीदा आणि किती वेगवेगळ्या प्रकारे वापरता येतील, याचं गणितसुद्धा ती करत असते. नेमकी हीच बाब डिझायनर्सनी अचूक हेरली आहे आणि त्यामुळेच तेही आता एकच दागिना वेगवेगळ्या पद्धतीने वापरता येईल अशा प्रकारचे डिझाइन्स बाजारात आणण्यास सुरुवात केली आहे. तसेच नेहमीच्या दागिन्यांच्या प्रकारांपेक्षा काही नवीन प्रकार आणण्याचे प्रयत्नही डिझायनर्सकडून करण्यात येत आहेत. पिवळं सोनं आणि सफेद हिरा यापलीकडे व्हाइट गोल्ड, रोज गोल्ड, अँटिक गोल्ड तसेच प्लॅटीनम वापरलं जाऊ लागलं आहे. कुंदन, जडावू तसेच गोल, चौकोन, त्रिकोणी, आयताकार किंवा ओव्हल अशा विविध आकाराचे, रंगांचे खडेसुद्धा सध्या दागिन्यांमध्ये वापरले जात आहेत. मीनाकारी नक्षी, जाळी डिझाइन सध्या ट्रेंडमध्ये आहे. मंदिरांवरचं नक्षीकाम तर डिझायनर्सना दिवसेंदिवस आकर्षित करत आहे. त्यामुळे पर्याय भरपूर वाढले आहेत. आधुनिक स्टाइलचे पण पारंपरिक टच असलेले प्रयोगशील दागिन्यांचा आनंद घेता येईल.

### बॉडी ज्वेलरी... नवा ट्रेंड

यंदाचा सर्वात वेगळा ज्वेलरी ट्रेंड पाहायला मिळाला तो म्हणजे 'बॉडी ज्वेलरी.' हा नवा ट्रेंड तरुणींमध्ये हळूहळू रुजू लागलाय. एरवी खांद्यावरून रुळणारा पदर, दुपट्टा असं वर्णन केलं जायचं. पण आता हे वर्णन दागिन्यांबद्दल होण्यास सुरुवात झाली तर आश्चर्य वाटायला नको. नेकपीसला जोडून येणाऱ्या, खांद्यावरून हातावर रुळणाऱ्या मोत्यांच्या किंवा खड्यांच्या सरी, मनगटावरील कडा आणि बोटातील अंगठ्यांना जोडणारी हातफुलाची सर, कानातल्या डुलाच्या मागून हळूच केसांना भेटणाऱ्या बारीक सरी, मांगटिका किंवा हेडपीसला पदर, केसात डुलणाऱ्या बारीक सरी हे या पद्धतीच्या ज्वेलरीचे काही प्रकार आहेत. बेली नृत्य करणाऱ्या मुलींच्या ब्लाऊजला जोडलेल्या आणि पोटापर्यंत लोंबकळणाऱ्या माळा असतात. या नृत्याचा मुख्य फोकस नृत्यांगनांच्या पोटाकडे असल्यामुळे या नृत्य सादर करताना, त्या माळांमुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधले जाते. मध्यंतरी गळा, हात फोकसमध्ये येतील अशा प्रकारे माळा लावलेले टॉप, कुर्ते बाजारात आले होते. आता ही जागा दागिन्यांनी घेतली आहे. अशा प्रकारच्या पदरीकरणाने त्या अवयवाचे सौंदर्य खुलते. सध्या इमिटेशन ज्वेलरीमध्ये या प्रकारांना असलेली मागणी पाहता सोन्याच्या दागिन्यांमध्येही हे प्रयोग करण्यात येत आहेत. अर्थात स्त्रियांना दागिन्यांबद्दल कुतूहल आणि प्रेम आहे, तोपर्यंत हे प्रयोग होत राहणार. त्यामुळे ही लखलखती दुनिया कायम तेवत राहणार, हे नक्की.



## शॉर्ट न्यूज

### निमगावात महिलेवर बिबट्याचा हल्ला

■ **संगमनेर :** तालुक्यातील निमगाव टेंभी येथे वर्षे वस्तीवर कपडे धुत असताना महिलेवर बिबट्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. यामध्ये ४२ वर्षीय महिलेच्या मानेवर व डोक्यावर दात लागल्याने ती जागीच ठार झाली. ही सर्व धक्कादायक घटना बुधवार दि. ११ सप्टेंबर रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या दरम्यान घडली. यामध्ये संगीता शिवाजी वर्षे ही मयत झाली आहे. या घटनेमुळे निमगाव टेंभी परिसरात शोककळा पसरली आहे. याच परिसरात एका विद्यार्थीनीवर बिबट्याने हल्ला केला होता.

### सरपंचावर दाखल अविश्वास ठराव मंजूर

■ **शेवगाव :** तालुक्यातील राक्षी येथील सरपंच सुमित्रा भक्तराज कातकडे यांच्या विरोधात ७ सदस्यांनी ४ सप्टेंबर रोजी तहसीलदार प्रशांत सांगडे यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केला होता. दाखल ठरावावर खातरजमा करण्यासाठी सरपंचासह त्या ७ सदस्यांना रीतसर नोटिसा देऊन मंगळवारी (दि. १०) सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात बैठक बोलावली असता तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या बैठकीला सरपंच कातकडे वगळता सर्व सातही सदस्य उपस्थित होते.

### तरुणाने गळफास घेऊन संपवले जीवन

■ **नेवासा :** तालुक्यातील वंजारवाडी येथे एका युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची घटना घडली. मात्र आत्महत्या करण्याचे कारण समजू शकले नाही. याबाबत सोनई पोलीस ठाण्यात अंबादास डोंगरे यांनी खबर दिली. पुतण्या निलेश कैलास डोंगरे, वय २१ याने वंजारवाडी शिवारात त्यांच्या शेतामध्ये आंब्याच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या खबरीवरून सोनई पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. पुढील तपास सोनई पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माळी यांच्या मार्गदर्शनाखाली सोनई पोलीस करत आहेत.

### सावकाराचा व्याजाच्या पैशासाठी छळ

■ **जामखेड :** व्याजाने पैसे देऊन व्याजासाठी शेतकऱ्याची छळवणूक करणाऱ्या सावकाराविरुद्ध खर्डा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जामखेड तालुक्यातील तेलंगशी येथील बाजीराव मोहन बहादुरे यांच्या फिर्यादीरून अशोक रामहरी सुरवसे यांच्या विरोधात सावकारकीचा गुन्हा दाखल झाला आहे. शेतकरी बाजीराव बहादुरे यांनी अशोक सुरवसे याच्याकडून २०२० मध्ये एक लाख रुपये तीन टक्के व्याजाने शेती कामासाठी घेतले होते. दोन कोरे चेक सह्या करून दिले होते.

### आदर्श शिक्षिका पुरस्काराने सन्मान

■ **नगर :** भुईकोट किल्ला येथील जिल्ह्यातील एकमेव हिंदी माध्यमच्या पंडित नेहरू हिंदी विद्यालयास रोटरी क्लब ऑफ अहमदनगर इंटिग्रिटीच्या वतीने आदर्श विद्यालय पुरस्काराने गौरविण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक सुहास धीवर यांना माध्यमिकचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस व राज्याचे माजी शिक्षण संचालक दिनकराव टेमकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच रोटरीच्या वतीने शाळेच्या विज्ञान शिक्षिका कविता जोशी यांनाही आदर्श शिक्षिका पुरस्कार के. बालराजू यांच्या हस्ते देण्यात आले.

# डॉ. विखे पाटील परिचर्या महाविद्यालयाचा अनोखा उपक्रम

## राष्ट्रीय पोषण आहार सप्ताह उत्साहात साजरा



**नगर : प्रतिनिधी**

**दरवर्षी ०१ ते ०७ सप्टेंबर रोजी देशभरात राष्ट्रीय पोषण आहार सप्ताह साजरा केला जातो. देशातील कुपोषण दर कमी करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय पोषण आहार सप्ताहाची सुरुवात केंद्र सरकारच्या वतीने करण्यात आली आहे. अन्नाचे पाच आवश्यक अन्नगट जाणून घेण्यासाठी पोषक आहार संपूर्ण आरोग्य सुधारण्यासाठी मदत करतो. याबद्दल विविध गटातील जनसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा सदरील सप्ताह साजरा करण्यामागील मुख्य उद्देश आहे.**

दरवर्षी, राष्ट्रीय पोषण सप्ताहासाठी एक विशिष्ट थीम निवडली जात असून यावर्षीच्या सप्ताहाचे घोषवाक्य सर्वांसाठी पोषक आहार असे असून जीवनाच्या सर्व टप्प्यांवर लोकांच्या पौष्टिक गरजा पूर्ण करणाऱ्या आहारांना प्रोत्साहन देण्यावर ते लक्ष केंद्रित करते. सर्व गटातील लोकांसाठी निरोगी आणि पौष्टिक आहाराचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी यावर्षी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील महाविद्यालयाने सात दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये प्रामुख्याने अंगणवाडीतील मुलांचा आहार तपासणी सर्वेक्षण व आरोग्य तपासणी, नर्सिंगच्या मुलींसाठी आहाराचे नियोजन कसे असावे याविषयी व्याख्यान, प्रसुती झालेल्या मातांना फळांचे वाटप, मातोश्री वृद्धाश्रमात फळांचे वाटप आणि पोस्टर प्रदर्शनाद्वारे समतोल आहाराविषयी जनजागृती करणे, असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

सदरील उपक्रम मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला असून परिचर्या महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रतिभा चांदेकर आणि उपप्राचार्य डॉ. योगिता औताडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना आपल्या जीवनात पोषक आहारास अनन्यसाधारण महत्व असल्याचे पटवून देत मोलाचे मार्गदर्शन केले.

या सप्ताहाच्या अनुषंगाने कार्यक्रमाचे आयोजन सहाय्यक प्राध्यापक अमोल आनाप, प्रिती कडू, विशाल पुलाटे आणि श्वेता भिंगारदिवे यांनी केले. तसेच नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यात सक्रिय सहभाग नोंदवला. संस्थेचे संचालक डॉ. अभिजीत दिवटे आणि मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ. रामचंद्र पडळकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन केले.

# सातेफळला मुस्लिम कुटुंबांकडून केली जाते गौराईची स्थापना

## दोन पिढयांची परंपरा जोपासली

**जामखेड : प्रतिनिधी**

**तालुक्यातील सातेफळ येथील एका मुस्लिम कुटुंबाने गौराईची स्थापना केली जाते. त्यांच्या गेल्या दोन पिढ्यापासूनची ही परंपरा जोपासली जात आहे. त्यांची ही परंपरा धार्मिक ऐक्याची ओळख बनली आहे.**



मूळचे धाराशिव येथील असेलेले रशीद दगडू सय्यद यांचे कुटुंब हे उदरनिर्वाहासाठी सातेफळ येथील खैरी मध्यम प्रकल्प कामानिमित्त स्थलांतरित झाले होते. गौराई स्थापनेच्या परंपरेबाबत सांगताना त्यांनी सांगितले की काही वर्षांपूर्वी सय्यद यांचे वडील दगडू नन्हु सय्यद यांना शेतात काम करत असताना लक्ष्मीच्या दोन मूर्ती सापडल्या होत्या. या मुर्त्या चार दिवस त्यांच्या शेतातच होत्या. त्यांनतर त्यांनी त्या लक्ष्मीच्या मूर्ती घरी आणल्या.

या मुर्त्यांचे काय करायचे याविषयी त्यांनी गावातील मंदिरातील पुजारी, मौलाना, ज्येष्ठ नागरिक यांच्याकडून सल्ला घेतला. त्यावेळी त्यांना सांगण्यात आले की तुम्ही मोठे नशीबवान आहात, ज्यामुळे तुम्हाला लक्ष्मीच्या मूर्ती सांपडला आहेत. या मुर्त्यांची गौरी गणपती सणाच्या दिवशी स्थापना करीत जा. त्यामुळेच रशीद दगडू सय्यद यांचे कुटुंब मागील ३९ वर्षापासून गणेशोत्सव काळात गौरीची स्थापना करत आहेत.

जामखेडमधील सय्यद कुटुंब हे गौराईची स्थापना गेल्या दोन पिढ्यांपासून करत आहे. त्यांचे सर्व कुटुंबीय या सणानिमित्त मनोभावे पूजा करतात. तसेच तीन दिवस उत्साहात सण साजरा करतात.

कष्टाच्या पायवाटेतून सापडली पोलिस दलाची दिशा

# आंबळे गावच्या दिशा बेंद्रे हिची पोलिस दलात निवड

## प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत गाठले यशाचे शिखर

**शिरुर : सतीश डोंगरे**



**घरची जेमतेम स्थिती, आईचे अपार कष्ट, सुविधांचा अभाव, अशा प्रतिकूल परिस्थितीवर जिद्दीने मात करत शिरुर तालुक्यातील आंबळे गावची दिशा बेंद्रे ही युवती पोलीस दलात दाखल झाली आहे. अनेक संकटांचा धीरोदात्तपणे सामना करत परिस्थितीने खचून न जाता मुलांसाठी आजतागायत कष्ट करणाऱ्या दिशाच्या मातेचेही आंबळे परिसरात कौतुक होत आहे.**

दिशा हिचे प्राथमिक शिक्षण आंबळे गावातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत झाले तर माध्यमिक शिक्षण शिरूरच्या विद्याधाम प्रशालेतून तिने पूर्ण केले. अकरावी व बारावी पासूनच ती पोलीस भरतीची तयारी करीत होती. एकीकडे शिक्षण आणि दुसरीकडे पोलीस भरतीचा सराव अशी कसरत करत अखेर दिशाने यशाचा टप्पा गाठला. शिरुरच्या श्लोक ॲकॅडमीतून तिने पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण घेतले. ॲकॅडमीचे प्रमुख अविनाश कारंडे यांनी तिला मार्गदर्शन केले. व्यायाम आणि सरावात सातत्य ठेवत नुकत्याच झालेल्या पुणे ग्रामीण पोलीस निवड चाचणीत दिशाने शारिरीक चाचणीत ३९ गुण आणि लेखी परीक्षेत ७७ गुण मिळवित पोलीस पदाला गवसणी घातली.

सर्वसामान्य कुटूंबातील एका युवतीने संघर्ष करत ज्या पोलीस दलाची महाराष्ट्रात ख्याती आहे त्या पुणे ग्रामीण पोलीस दलात आपले स्थान निश्चित करत आपल्या आईच्या काबाड कष्ट आणि मेहनतीचे चीज केले आहे. प्रयत्न केले तर सर्व काही शक्य होते. फक्त प्रयत्न करण्याची तयारी पाहीजे असेच दिशा बेंद्रे हिने जिद्द आणि चिकाटीने दाखवून दिले आहे. एका ग्रामीण भागातील युवतीची पुणे ग्रामीण पोलिस दलात झालेली निवड ही केवळ युवतींनाच दिशा देणारी आहे असे नव्हे तर सर्वांसाठीच एक आदर्श आहे.

या मिळालेल्या यशाने दिशाला आकाश ठेंगणे झाले तर आईचा आनंद गगनात मावेनासा झाला. दिशाला एक भाऊ आहे. दोघा बहिण भावांनी शिकून खूप मोठे व्हावे ही आईची इच्छा त्यासाठी तिने मोलमजुरी करून मुलांना शिकविले आज मुलगी पोलीस झाल्याचे समजल्यानंतर आईच्या चेहऱ्यावरील आनंद खूप काही सांगून जाणारा होता. नातेवाईक आणि संपूर्ण आंबळे परिसरातून दिशावर आणि तिच्या आईवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### भविष्यात पोलिस अधिकारी होण्याचे स्वप्न !

**लहानपणापासूनच पोलीस खात्यात नोकरी करण्याचे स्वप्न पाहिले होते. आज ते सत्यात उतरले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन अधिकारी होण्याचे ध्येय होते पण परिस्थिती आडवी आली. अर्थिक अडचणींमुळे ते शक्य झाले नाही. त्यातच गेल्या वर्षी वडिलांचे निधन झाले. पण अजूनही जिद्द सोडलेली नाही. भविष्यात स्पर्धा परीक्षांमधून हे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी मेहनत घेणार आहे. मला सर्वोतोपरी प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या कुटुंबासह नातेवाईक, मित्र-मैत्रिणी परिवार आणि ग्रामस्थ सर्वांचे आभार !**

**कु. दिशा मदन बेंद्रे**
**पुणे ग्रामीण पोलीस**

(पान १ वरून)

## राज्यात फक्त दोनच साहेब आहेत !

या दोनच नेत्यांना साहेब मानते. केवळ एखाद्या पक्षाचा अध्यक्ष होणे म्हणजे साहेब होणे असा अर्थ होत नाही. त्यासाठीचा सांस्कृतिक आणि एकूणच सामाजिक व्यासंग असावा लागतो. त्यासाठी स्वकर्तृत्वावर मोठं व्हावं लागतं. कोणाच्याही जीवावर मोठं होऊन चालत नाही. स्वतः च्या कर्तृत्वावर उभं राहणं असेल, संकटाच्या वेळी वादळं छातीवर घेणं असेल, संकट आलं म्हणून भूमिका बदलण्यापेक्षा संकट छातीवर झेलणं असेल, या सर्व गोष्टी करणं म्हणजे शरद पवार साहेब होणं असा अर्थ होतो.अजित पवारयांना ही गोष्ट माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांने सांगायची आवश्यकता नाही''.

**अजित पवार काय म्हणाले होते?**

पुण्यातील खेड येथे अजित पवारांच्या पक्षाने गुरुवारी शेतकरी मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात अजित पवार म्हणाले होते, ''राष्ट्रवादीत आता आपणच साहेब आहोत. त्यामुळे आपणच निर्णय घेणार''. त्यावरअमोल कोल्हेम्हणाले, ''अजित पवारांना खरे साहेब कोण आहेत हे चांगलंच माहिती आहे. आपणच साहेब हे अजित पवारांनी चेष्टेने केलेलं वक्तव्य असेल. राज्यात फक्त शरद पवार व बाळासाहेब ठाकरे हे दोनच साहेब आहेत''.

**खेड आळंदीला लाल दिव्याची गाडी देणार : अजित पवार**

महायुतीत आळंदी खेडची जागा (विधानसभा मतदारसंघ) आपल्या राष्ट्रवादीकाँग्रेसपक्षाकडे आली तर दिलीप मोहिते यांना पुन्हा एकदा निवडून द्या'', असं आवाहन अजित पवार यांनी यावेळी केलं. तसेच ते म्हणाले, तुम्हा सर्वांचं लाल दिव्याच्या गाडीचं स्वप्न आहे. ही जागा आपल्याकडे आल्यास, दिलीप मोहिते पुन्हा निवडून येतील. तेव्हा आपण खेड-आळंदीला लाल दिव्याची गाडी देऊ.

### लाडकी बहीण योजनेतही फसवणूक?

लाडकी बहीण योजनेत २१ ते ४५ वयोगटातील दुर्बल घटातून येणाऱ्या महिलांना प्रति महिना दीड हजार रुपयांची मदत दिली जात आहे. या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरले जात आहेत. या संधीचा फायदा घेऊन कन्नड तालुक्यातील १२ पुरुषांनी महिलांचे फोटो वापरून अर्ज भरले आहेत. सोशल मीडियावर आजवर पुरुष महिलांच्या नावाने अकाऊंट उघडून फसवणूक करत असल्याचे अनेक प्रकार घडले आहेत. मात्र महिलांचे फोटो वापरून थेट सरकारलाच गंडविण्याचा हा धक्कादायक प्रकार कन्नड तालुक्यात घडला आहे.

कन्नड तालुक्यात लाडकी बहीण योजनेसाठी ९२ हजाराहून अधिक अर्ज आले आहेत. या अर्जांची छाननी करत असताना महिला व बालकल्याण विभागाच्या निदर्शनास सदर बाब आली. १२ जणांनी अर्ज सादर करताना महिलेचा फोटो वापरला असला तरी कागदपत्र मात्र स्वतःचीच जमा केली आहेत. यामध्ये आधार कार्ड, हमीपत्र आणि बँक खात्याची माहितीही अर्जदारांनी स्वतःच्या नावाने भरली आहे. या प्रकारानंतर आता या १२ भावांवर कारवाई करण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच सातारा जिल्ह्यातील एका व्यक्तीने ३० जणांच्या आधार कार्डचा गैरवापर करून तब्बल ३० अर्ज भरले असल्याचे समोर आले होते. धक्कादायक म्हणजे यापैकी २६ खात्यांत पैसेही जमा झाले होते. पनवेलमधील एका महिलेचा अर्ज स्वीकारला जात नव्हता. तेव्हा तिच्या आधार क्रमाकांचा कुणीतरी आधीच वापर केल्याचे निष्पन्न झाले. यानंतर सखोल चौकशी केली असता हा घोटाळा उघड झाला होता.

'लाडकी बहीण' योजनेत सुमारे २ कोटी लाभार्थींना दरमहा दीड हजार रुपये गृहीत धरून उपमुख्यमंत्रीअजित पवारयांनी अर्थसंकल्पात वर्षाला ४६ हजार कोटींची तरतूद केली आहे.

# महाविकास आघाडी १८० हून अधिक जागा जिंकेल

## आ.बाळासाहेब थोरात यांचा दावा

**मुंबई : प्रतिनिधी**

**आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला १८० हून अधिक जागा मिळतील, असा ठाम विश्वास काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी गुरुवारी येथे बोलताना केले. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांच्या घरी दिलेल्या भेटीवरही भाष्य केले. सध्या सरकार न्यायव्यवस्थेवर दबाव टाकत असल्याची चर्चा आहे. पण सरन्यायाधीश चंद्रचूड हे त्यापलिकडचे आहेत असे मला वाटते, असे ते म्हणालेत.**

बाळासाहेब थोरात यांनी गुरुवारी येथे पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी महाविकास आघाडीच्या जागावाटपासह विविध मुद्यांवर दिलखुलास मते व्यक्त केली. विशेषतः त्यांनी जागावाटपाचा मुद्दा मित्रपक्षांना विश्वासात घेऊन निकाली काढला जाईल असे जोर देऊन स्पष्ट केले. ते म्हणाले की, जागावाटपाच्या मुद्यावर महाविकास आघाडीच्या आतापर्यंत दोन-तीन बैठका झाल्या. त्यात १२५ जागांवर एकमत असल्याचे दिसून आले. उर्वरित जागांवरही लवकरच विचार करून निर्णय घेतला जाईल. एमआयएमने एखादा प्रस्ताव दिला आहे का? याची माहिती नाही. पण असे काही असेल तर त्याचा निर्णय वरिष्ठ पातळीवरच घेतला जाईल. राज्यात महाविकास आघाडीच्या १८० हून अधिक जागा आल्या तर नवल वाटू देऊ नका.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST | MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# भाविकांना अल्पदरात भोजन हा मळगंगा ट्रस्टचा सेवाभावी उपक्रम !

## पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी केले कौतुक



■ पारनेरचे पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी नुकतीच निघोज येथील मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने सुरू केलेल्या प्रसादालयाला भेट दिली यावेळी कपिलेश्वर उद्योग समूहाचे सर्वे सर्वा सोमनाथ वरखडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

**निघोज : प्रतिनिधी**

**मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट माध्यमातून भाविकांना अल्पदरात भोजन व्यवस्था हा सेवाभावी उपक्रम असून या प्रसादालयासाठी अन्नदात्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन पारनेरचे पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी केले आहे. त्यांनी नुकतीच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने सुरू केलेल्या प्रसादालयाला भेट दिली व प्रसादाचा आस्वाद घेतला यावेळी ते बोलत होते.**

यावेळी कपिलेश्वर उद्योग समूहाचे सर्वे सर्वा सोमनाथ वरखडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी माजी सरपंच व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त ठकारामशेठ लंके, उपसरपंच ज्ञानेश्वर वरखडे, किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे अध्यक्ष शिवाजीराव लंके, ॲड. गणेश लाळगे, सामाजिक कार्यकर्ते दिलीपराव ढवण, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्करराव कवाद तसेच पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त ठकारामशेठ लंके यांनी माहिती देताना सांगितले की मळगंगा देवी हे राज्यातील जागृत देवस्थान असल्याने वर्षभर या ठिकाणी राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. त्यांची भोजनाची उत्तम व्यवस्था अल्पदरात होण्यासाठी मळगंगा ग्रामीण ट्रस्टने फक्त वीस रुपयांत पोटभर जेवणाची व्यवस्था केली आहे. गेली आठ दिवसात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला आहे. मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे कार्याध्यक्ष शांताराम लंके, उपकार्याध्यक्ष वसंत कवाद सर, कोषाध्यक्ष अ

मृताशेठ रसाळ, सचिव शांताराम कळसकर, संघटक रामदासशेठ वरखडे, सहसचिव विश्वासराव शेटे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली सर्व विश्वस्त मंडळ व निघोज ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या माध्यमातून विविध विकासयोजना मोठ्या प्रमाणात होत असून सामाजिक कामांना गती मिळाली आहे. या ठिकाणी प्रसादालय सुरू करावे ही ग्रामस्थांची मागणी होती त्याप्रमाणे प्रसादालय सुरू केले असून अनेक अन्नदात्यांनी सहकार्य केले असल्याची माहिती लंके यांनी दिली आहे.

# गरीब घरातील मृत संतोषच्या कुटूंबाला गावकऱ्यांचा मदतीचा हात

## अवघ्या चार दिवसात अडीच लाख जमा

**जवळा : प्रतिनिधी**

**गेल्या दहा दिवसापूर्वी जवळा येथील आपल्या मुलीला रात्री शेजारच्या घरून दूध आणण्यासाठी गेलेल्या संतोष दत्तात्रय बर्शीले वय (३५) याचा घराजवळच्या शेतात बांधावर टाकलेल्या वीज तारेचा धक्का बसून जागीच मृत्यू झाला.यामुळे कुटूंबावर मोठा आघात झाला.या कुटूंबाला मदतीचा हात देण्यासाठी ग्रामस्थ सरसावले असून अवघ्या चार दिवसात अडीच लाख रूपयांची मदत जमा झाली आहे.**

दूध आणण्यासाठी गेलेला संतोष रात्री आठ वाजले तरी घरी कसा येईना म्हणून घरच्यांनी त्याचा शोध घेतला असता संतोष वीज तारेला गुंडाळलेल्या आवस्थेत मृत आढळून आला होता.अतिशय गरीब कुटूंबातील संतोष हा प्रामाणिक, सहृदयी, सरळमार्गी तरुण त्याच्या आचानक जाण्याने त्याचे संपूर्ण कुटुंब क्षणात निराधार झाले संतोष हा शिरूर येथे एका खाजगी कृषी दुकानात सेल्समन म्हणून काम करून आपल्या कुटुंबाचा निर्वाह करत होता.

त्याच्या मागे पत्नी, दोन चिमुकल्या मुली, आई वडील भाऊ असा परिवार



■ मृत संतोषच्या कुटुंबियांना दशक्रिया विधित आर्थिक मदत करताना जवळा ग्रामस्थ

असून त्यांच्यावर अक्षरशः दुःखाचा डोंगर कोसळून कुटुंब एकाकी उघड्यावर पडले असताना सोसायटीचे अध्यक्ष संतोष आढाव, माजी सरपंच किसनराव रासकर, पप्पू पठारे, पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष सतिष रासकर, पोपट शिंदे, भाऊ आढाव,रमेश रासकर, व संतोष चे वर्ग मित्र आणि जवळा ग्रामस्थांनी एकत्र येत संतोष च्या घरच्याना मानसिक आधार देत कुटुंबाला दुःखात एकटे न सोडता एक हात मदतीचा या संकल्पनेतून लोकांना आवाहन करत अवघ्या चार दिवसात दोन लाख सत्तावीस हजार रुपयांची मदत गावातून गोळा केली व कुटुंबाच्या नावे बँकेत ठेव ठेवत त्यांना आर्थिक आधारही दिला.

जाती पातीच्या बाहेर जाऊन गोर गरिबांच्या सुख दुःखात नेहमी पुढे असणाऱ्या जवळा गावाने आपला माणुसकीचा धर्म कायम जपला त्यामुळे पुन्हा एकदा जवळेकरांनी परिसराला एक आदर्श असे काम करत माणुसकीचे दर्शन घडविले.

# मुलिकादेवी विद्यालयाचा संघ तालुक्यात पहिला

## तालुकास्तरीय क्रिकेट स्पर्धा | १४ वर्षे वयोगटात प्रथम क्रमांक



**निघोज : प्रतिनिधी**

**जिल्हा क्रीडा कार्यालय नगर आयोजित पारनेर तालुका क्रिकेट स्पर्धेत न्यू आर्ट कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज पारनेर येथे संपन्न झाले.या क्रीडा स्पर्धेत श्री मुलिकादेवी विद्यालय निघोज येथील १४ वयोगट क्रिकेट (मुले) या संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला. या खेळाडूंची निवड जिल्हा क्रिकेट स्पर्धे साठी निवड झाली आहे.**

कोपरगाव या ठिकाणी (कोकमठाण) पारनेर तालुक्याचे नेतृत्व करणार आहे.या संघात अनुज भोसले,सर्वम आल्हाट,फरहान तांबोळी,सार्थक खामकर,स्वराज लंके,आदित्य वरखडे,वेदांत काकडे,कृष्णा इरोळे, गौरव कवाद,संग्राम लंके,सार्थक लामखडे,जय कोरडे,सोहम काळे,अंश थोरात या खेळाडूंनी उत्तम कामगिरी बजावली.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज या संस्थेचे अध्यक्ष रा.ह.दरे, सचिव विश्वासराव आठरे ,विश्वस्त मा. आ नंदकुमार झावरे,सीताराम खिलारी, विद्यालयाचे प्राचार्य के.बी. शिंदे ,सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले.

या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक बी.एम. शिंदे, इनामदार सर,गुंजाळ सर,बारामते सर,गोरखे सर,आवारी सर, पुष्पाताई वराळ , पोटे मॅडम यांचे मार्गदर्शन मिळाले. पारनेर तालुका पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ताजी उनवणे, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाबाजी वाघमारे तसेच निघोज ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठान गणेश मंडळाचे उपक्रम समाजसेवी

## ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिनिधी**

**आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठान गणेश मंडळाचे उपक्रम सेवाभावी असून सर्व समाजाला प्रेरणादायी उपक्रम राबवीत गणेश मंडळाने कार्यरत राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन आपला गणपती समाजसेवा प्रतिष्ठान गणेश मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर यांनी व्यक्त केले.मंडळाच्या कार्यक्रमाच्या बैठकीत आढावा घेताना त्यांनी मार्गदर्शन केले.**

यावेळी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रवि रणसिंग, मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक व मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त बबनराव ससाणे, मंडळाचे कार्याध्यक्ष भास्करराव सोनवणे, सचिव रोहित पठारे तसेच पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रसिद्ध ठेकेदार विलास हारदे यांच्या हस्ते मंडळाच्या गणपती बाप्पाची आरती करण्यात आली. हारदे यांनी सहारा कंट्रक्शनच्या वतीने मंडळाच्या शंभर सदस्यांना टी शर्ट दिले.

निघोजकर यांनी सांगितले की मंडळाच्या वतीने शनिवारी व रविवारी दोन दिवस होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम आयोजित केला असून दोन दिवसांतील विजेत्या महिला स्पर्धकांना कन्हैया ज्वेलर्सचे संचालिका शोभाताई मुकुंदराव निघोजकर, संचालक सुदर्शन निघोजकर, संचालक कृष्णा वरखडे यांच्या वतीने आकर्षक पैठणी देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिलांनी सहभागी होण्याचे आवाहन मंडळाचे अध्यक्ष रवि रणसिंग, भास्करराव सोनवणे व रोहित पठारे यांनी केले आहे.

रविवारी रात्री बक्षीस समारंभ मान्यवरांच्या हस्ते आयोजित केला असून रात्री महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. गेली सहा दिवसात मंडळाने विविध प्रकारच्या स्पर्धा भरवून महिला भगिनी व विद्यार्थी यांना उत्तेजन दिले असून मंडळाने गेली सहा वर्षात मंडळाचे अध्यक्ष रवि रणसिंग, मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक मुकुंदराव निघोजकर तसेच बबनराव ससाणे, भास्करराव सोनवणे व पदाधिकारी व सदस्य यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली विकासाभिमुख कामांना पाठबळ देत परिसर विकासासाठी योगदान दिले असल्याची माहिती मंडळाचे सचिव रोहित पठारे यांनी दिली आहे.

# बाळासाहेब क्षीरसागर यांचे संगीत विशारद परिक्षेत यश

## समाजबांधवांच्या वतीने पिंपळनेरला सत्कार

**लोणी मावळा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील बाळासाहेब दादाभाऊ क्षीरसागर यांनी संगीत विशारद परीक्षेमध्ये यश संपादन केले आहे.ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.**



अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मुंबई यांचे मार्फत घेण्यात आलेल्या संगीत विशारद माध्यम परीक्षेत बाळासाहेब दादाभाऊ क्षीरसागर यांनी उत्तम प्रकारे संपादन केले आहे. वयाच्या ५३ व्या वर्षी त्यांनी चिकाटी व जिद्द टेवून तसेच नित्य व्यवसायिक कामे सांभाळून त्यांनी या संगीत विशारद परीक्षेमध्ये यश संपादन केल्याने त्यांचा विश्वकर्मा जयंतीचे औचित्य साधून समस्थ विश्वकर्मा सुतार समाज बांधवांच्या वतीने श्रीक्षेत्र पिंपळनेर येथे त्यांचा सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल लोणी मावळा गावच्या सरपंच मंगलताई शेंडकर , माजी सरपंच गणेश मापारी,चेअरमन स्वप्निल मावळे, डॉ. मावळे पाणी वाटप संस्थेचे चेअरमन संतोष शेंडकर ,माजी सरपंच दत्तात्रय क्षीरसागर ,रयत सेवक अशोकराव धुमाळ, शाळा समितीचे अध्यक्ष देवराज शेंडकर संपतराव शेंडकर ,डॉ.शौकत शेख ,शरद लाळगे, रावसाहेब शेंडकर, बाळासाहेब शेंडकर आदींनी अभिनंदन केले.या परीक्षेसाठी त्यांना श्री.धावडे सर यांचे मार्गदशन लाभले

# वाघुंड्यात शालेय साहित्याचे वितरण

## सचिन पठारे यांच्या वाढदिवसाचे औचित्य



■ खा. नीलेश लंके यांचे सहकारी सचिन पठारे यांच्या वाढदिवसानिमित्त वाघुंडे बुद्रुक येथील प्राथमिक शाळेत शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले.

**वाघुंडे बुद्रुक : प्रतिनिधी**

**वाघुंडे बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये खा. नीलेश लंके यांचे विश्वासू सहकारी सचिन पठारे यांच्या वाढदिवसानिमित विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य तथा माजी उपसरपंच दत्ता दिवटे यांनी दिली.**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून यांप्रसंगी शिक्षकांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी दत्ता दिवटे यांच्यासह मेजर संतोष तरटे, ज्ञानदेव जगताप, सतिश भालेकर, राहूल सोनुळे, संदेश येणारे, हर्षल जगताप, आकाश पठारे, सरपंच संदीप वाघमारे, उपसरपंच संतोष गाडीलकर, अनिल गाडीलकर, शरद रासकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मंगेश गाडीलकर हे उपस्थित होते.

यावेळी बोलताना सचिन पठारे म्हणाले, प्रत्येक वंचित घटकाला आपल्या परीने काहीतरी मदत मिळाली पाहिजे या भावनेतून खा. नीलेश लंके हे दररोज काम करतात. आपल्या वाढदिवसानिमित्त आपण दरवर्षी काहीतरी सामाजिक उपक्रम राबवून हा दिवस संस्मरणीय करतो. यंदाही विविध शाळांमध्ये शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम हाती घेण्यात आल्याचे पठारे म्हणाले.

पठारे पुढे म्हणाले, २४ तास ३६५ दिवस केवळ आपल्या मायबाप जनतेसाठी काम करणारे खा. नीलेश लंके हे आमचे आदर्श आहेत. प्रत्येक गावात विकास काम झाले पाहिजे. प्रत्येक शालेय विद्यार्थ्याला शालेय साहित्याबरोबरच सर्व प्रकारची मदत मिळाली पाहिजे. लांबच्या अंतरावरून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्याला सायकलची सोय झाली पाहिजे याची ते नेहमीच काळजी घेतात. कोठेही गेले तरी सत्कार म्हणून शालेय साहित्य स्विकारतात व त्याचे मतदारसंघातील गरजू विद्यार्थ्यांना त्याचे वितरण करतात. त्यांचे हे धोरण अनुकरणीय असल्याचे पठारे यांनी सांगितले.

# जातेगांवात ज्वारी बियाण्याचे मोफत वाटप

## कृषि विभागाची योजना

**जातेगांव : प्रतिनिधी**

**तालुक्यातील जातेगांव येथे राज्य शासनाच्या कृषि विभागामार्फत महाबीज कंपनीचे ज्वारी पिकाचे बियाण्याच्या शंभर पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. रब्बी हंगामाच्या पार्श्वभुमीवर कृषि विभागाकडून वेळेवर बियाणे मिळाल्याने शेतकरी वर्गाकडून कृषि विभागाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.**

कृषि विभागाच्या पौष्टीक तृणधान्य अभियानांतर्गत ज्वीरी वाण फुले सुचित्राचे वाटप करण्यात आले. बियाण्यासोबत बीज पक्रिया जावाणू संघही देण्यात आले. प्रत्येकी ४ किलो वजनाच्या १०० पिशव्यांचे शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले.

यावेळी कृषि सहाय्यक विजय साबळे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की योग्य अंतरावर ज्वारी पिकाची पेरणी करावी. बीज प्रक्रियेसाठी उतारावर आडवी पेरणी करावी. यावेळी साबळे यांनी सेंद्रीय जैविक किड नियंत्रणाबाबतही शेतकऱ्यांना सविस्तरपणे मार्गदर्शन केले.




**साबळे यांचे योगदान**

**कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत असून त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळतो आहे. विविध योजना राबविण्यात कृषि सहाय्यक विजय साबळे यांचे मोलाचे योगदान असते. प्रत्येक शेतकऱ्याशी संपर्क करून ते योजनांची माहीती तसेच मार्गदर्शन करतात.**

**गवराम ढोरमले**
**शेतकरी, जातेगांव**

बियाणे वितरणाप्रसंगी मंडळ कृषि अधिकारी सरोदे, कृषि पर्यवेक्षक एम बी साबळे, कृषि सहाय्यक विजय साबळे, सरपंच संजय गायकवाड, हरिभाउ फटांगडे, सोपान पोटघन, प्रभू गायकवाडद्व पठाण गुरूजी, विनायक ढोरमले, सुभाष ढोरमले, साजन ढोरमले, बन्सी ढोरमले, सुवर्णा फटांगरे, गवराम ढोरमले, सोन्याबापू पोटघन यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com